| MHKO120005672024 | खटला दाखल तारीख : १६/०८/२०२४ |
|---|---|
| | खटला नोंदणी तारीख : १६/०८/२०२४ |
| | खटला निकाल तारीख : २३/०७/२०२६ |
| | कालावधी : ०१ वर्षे ११ महिने ०७ दिवस |

**भाग अ***

**(न्यायनिर्णयाचे शिर्षक पृष्ठ)**

**[फौजदारी नियमावलीच्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्र. ४४ (१)]**

**नि.क्र.११/ब**

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, गारगोटी यांच्या न्यायालयात,**

**पिठासिन अधिकारी : श्री. एन. डी. रुद्रभटे**

| | |
|---|---|
| पहिल्या खबरीचा तपशील | अपराध क्र.–७३/२०२४ |
| न्यायनिर्णयाची तारीख | २३/०७/२०२६ |
| प्रकरण क्रमांक | **संक्षिप्त फौजदारी खटला क्र.–२३४/२०२४** |
| तक्रारकर्ता/अभियोग पक्ष | **महाराष्ट्र शासन**<br>राज्य उत्पादन शुल्क, गडहिंग्लज,<br>(फिर्यादी संदीप धोंडीराम जानकर) |
| तर्फे प्रतिनिधीत्व करणार | **श्री. डी. ए. बनसोडे**<br>(सुविद्य सहाय्यक सरकारी अभियोक्ता) |
| आरोपी | **अनिता बाळासो डवरी**<br>वय– ४८ वर्षे,<br>रा. कूर, ता. भुदरगड, जिल्हा– कोल्हापूर. |
| तर्फे प्रतिनिधीत्व करणार | श्री. एम. पी. पाटील<br>(बचाव पक्षातर्फे सुविद्य विधीज्ञ) |

**भाग ब***

**[फौजदारी नियमावलीच्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्र. ४४ (२)]**

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | २०/०४/२०२४ |
| प्रथम खबर अहवालाची तारीख | २०/०४/२०२४ |
| दोषारोपपत्र दाखल झाल्याची तारीख | १६/०८/२०२४ |
| दोषारोप ठेवल्याची तारीख | २०/०४/२०२६ |
| पुरावा आरंभ झाल्याची तारीख | ०२/०७/२०२६ |
| प्रकरण न्यायनिवाड्यासाठी राखून ठेवल्याची तारीख | निरंक |
| न्यायनिवाड्याची तारीख | २३/०७/२०२६ |
| शिक्षा आदेशाची, जर असल्यास, तारीख | निरंक. |

**<u>आरोपीचा/आरोपींचा तपशील</u>**

| अ. क्र. | आरोपीचे नाव | अटक तारीख | जामीन मुक्त तारीख | दोषारोपीत गुन्हा | निर्दोष की दोषसिद्ध | ठोठाविलेली शिक्षा | फौ.प्र.सं. चे कलम ४२८ च्या उद्देशासाठी संपरिक्षा अवधित व्यतीत केलेली बंदी अवधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | अनिता बाळासो डवरी | लागू नाही. | ०९/०१/२०२५ | म.दा.बं. का. चे कलम ६५ (ई) अन्वये | निर्दोष | निरंक | निरंक |

**भाग क***

**[फौजदारी नियमावलीच्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्र. ४४ (३)]**

अभियोगपक्ष/बचावपक्ष/न्यायालयीन साक्षीदार यांची यादी

**(अ) अभियोग पक्षातर्फे साक्षीदार –**

| अभियोग साक्षीदार क्र. | साक्षीदाराचे नांव | साक्षीदाराचे स्वरुप |
|---|---|---|
| १. | प्रकाश पांडुरंग चव्हाण (नि.क्र.८) | पंच |

**(ब) बचावप क्षातर्फे साक्षीदार – निरंक**

**(क) न्यायालय तर्फे साक्षीदार – निरंक**

अभियोग पक्ष/ बचाव पक्ष/न्यायालय निशाणी क्रमांक

**(अ) अभियोग पक्षातर्फे निशाणी –**

| निशाणी क्र. | निशाणीचे वर्णन | कोणत्या साक्षीदारामार्फत सिद्ध केले |
|---|---|---|
| ९ | पंचनामा | अभियोग पक्ष क्र. १ |

**(ब) बचाव पक्षातर्फे निशाणी – निरंक**

**(क) न्यायालय पक्षातर्फे निशाणी – निरंक**

**(ड) भौतिक वस्तु –**

| भौकि वस्तु/मुद्देमाल क्रमांक | भौतिक वस्तु/मुद्देमाल वर्णन | कोणत्या साक्षीदारामार्फत सिद्ध |
|---|---|---|
| निरंक | लागू नाही | लागू नाही |

## न्यायनिर्णय

## [आज दिनांक – २३/०७/२०२६ रोजी घोषित]

अभियोग पक्षाने आरोपीविरुद्ध **महाराष्ट्र मद्य प्रतिबंधक अधिनियम, १९४९** चे **कलम ६५ (ई)** प्रमाणे दोषारोप दाखल केले आहे..

**अभियोगपक्षाचे कथन थोडक्यात असे की –**

२. वर्दीदार यांना खात्रीशीर अशी बातमी मिळाली की, मौ. कूर, ता. भुदरगड गावच्या हद्दीत पाण्याच्या टाकीशेजारी आरोपी ही देशी दारु चोरुन विनापरवाना बेकायदेशीररित्या विक्री करत आहे. त्यानुसार मिळालेल्या बातमीच्या अनुषंगाने दोन पंच व इतर रेडींग स्टाफ घेऊन घटनास्थळी छापा टाकला, आरोपी ही तिच्याजवळ असलेल्या कापडी पिशवीमध्ये महाराष्ट्र राज्य निर्मित देशी दारू पहिली धार संत्रा १८० मिलीच्या २६ सिलबंद बाटलया व २ उग्र वासाचे ग्लास विक्री करण्याच्या उद्देशाने बाळगलेल्या स्थितीमध्ये आढळून आली. तिच्या ताब्यातील सर्व मुद्देमाल जप्त करण्यात आला व त्यापैकी १८० मिलीच्या बॉटलमध्ये दारु नमुना पृथःकरणासाठी काढून घेतली. त्यानंतर वर्दीदार यांनी आरोपीने तिच्या कब्जात बेकायदेशीर देशी दारु जवळ बाळगल्याने त्याचेविरूद्ध गुन्हा नोंद क्र. ७३/२०२४ हा नोंदविण्यात आला. सदर गुन्ह्याचा तपास श्री. पी. आर. खरात, निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, गडहिंग्लज यांनी केला. त्यांनी साक्षीदारांचे जबाब नोंदविले. तपास पूर्ण झाल्यानंतर आरोपीविरुद्ध महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५ (ई) प्रमाणे न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

३. आरोपीविरुद्ध महाराष्ट्र मद्य प्रतिबंधक कायद्याचे कलम ६५ (ई) अन्वयेच्या शिक्षापात्र गुन्ह्यासाठी **नि.क्र.७** वर दोषारोप ठेवला. आरोपीने गुन्हा अमान्य केल्यामुळे त्याच्याविरूद्ध खटला पुढे चालविण्यात आला. अभियोग पक्षाद्वारे केवळ एक पंच तपासण्यात

आला. आरोपीविरुद्ध गुन्हादर्शक पुरावा समोर आल्याने आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम **३१३(१)(ब)** नुसार निवेदन **नि.क्र.१०** वर नोंदविण्यात आले आहे. आरोपीचा बचाव हा केवळ नकार आहे. आरोपीने त्याच्या बचावार्थ स्वतःला अथवा इतर कोणताही साक्षीदार तपासला नाही, अगर कोणताही कागदोपत्री पुरावा सुद्धा सादर केला नाही. निशाणी १ खालील आदेशाप्रमाणे अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला.

**४.** अभियोग पक्षाकडून सहाय्यक शासकीय अभियोक्ता श्री. डी. ए. बनसोडे व आरोपीतर्फे त्याचे विद्वान अधिवक्ता श्री. एम. पी. पाटील यांचा युक्तीवाद ऐकला.

**५.** न्यायालयासमोर उपलब्ध असलेला दोषारोप व त्यास अनुसरून सादर करण्यात आलेल्या पुराव्याच्या अनुषंगाने पुढील बाबी माझ्या विचारार्थ उपस्थित होतात. त्यांवरील माझे निष्कर्ष त्यापुढे येणाऱ्या कारणांस अनुसरून मी खालीलप्रमाणे नोंदविले आहेत.

| | **विचारार्थ बाबी** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | आरोपी हा दि. २०/०४/२०२४ मौ. कूर, ता. भुदरगड गावच्या हद्दीत बेकायदेशीरपणे स्वत:च्या फायद्याकरीता देशी दारू विक्री करण्यासाठी जवळ बाळगलेल्या स्थितीत मिळून आली, हे अभियोग पक्षाने सिद्ध केले आहे काय ? | **नकारार्थी** |
| २. | आदेश काय ? | **अंतिम आदेशाप्रमाणे.** |

## <u>का र ण मि मां सा</u>

**<u>विचारार्थ बाब क्र. १ बाबत : –</u>**

**६.** प्रथमतः अभियोगपक्षास हे सिद्ध करणे अनिवार्य आहे की, आरोपीच्या ताब्यात विधिनिषिद्ध मद्य मिळून आले आणि तद्नंतर अभियोगपक्षास हे सुद्धा सिद्ध करावे लागेल की, आरोपीच्या ताब्यातून मिळून आलेला पदार्थ हा अफू व्यतिरिक्त इतर कोणतेही मादक द्रव्य अथवा भांग आहे. अशा परिस्थितीत जप्ती पंचनामा हा पुराव्यातील महत्वाचा घटक ठरतो.

७. पंचाच्या उपस्थितीत पंचनामा तयार करण्यामागील महत्वाचा उद्देश म्हणजे पोलीसांच्या कारवाईस स्वतंत्र पुष्टी देणे हा आहे. त्यामुळे, अशा प्रसंगी पंचनामा हा अन्वेषणातील महत्वाचा घटक ठरतो. पंच हे केवळ स्वतंत्र साक्षीदार नसून ते पोलीसांच्या कारवाईस व कार्यवाहीस स्वतंत्रपणे पुष्टी देण्याचे काम करतात. त्यामुळे पंचनामा हा पूरक व पुष्टी देणारा दस्त ठरतो. मात्र, तो सिद्ध होणे आवश्यक आहे.

८. अभियोग पक्षास पुढे हेही सिद्ध करावे लागेल की, आरोपीच्या ताब्यातून मिळालेला पदार्थ हा मादक द्रव्य होता. त्यासाठी त्या पदार्थाचे रासायनिक स्वरूप सिद्ध करणे पर्यायाने आवश्यक ठरते. यास्तव, केवळ रासायनिक विश्लेषण हा एकच उपाय आहे.

९. **मद्य प्रतिबंधक कायद्याच्या कलम १०३** पुढीलप्रमाणे उद्धृत करते,

*'१०३. **काही बाबतीत अपराध करण्यात आला आहे असे गृहित धरणे :***

*ह्या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदीन्वये चालविलेल्या खटल्यात, तव्दिरूद्ध सिद्ध करण्यात येईपर्यंत आरोपी व्यक्तीने, जे जवळ बाळगण्याबद्दल त्यास समाधानकारक रितीने कारण दाखविता येत नाही असे कोणतेही मादक द्रव्य, भांग, मोहाची फुले किंवा काकवी याबाबत अथवा अशी कोणतीही दारू गाळण्याची भट्टी, भांडी, साधने किंवा उपकरणे याबाबत (अथवा कोणतेही मादक द्रव्य तयार करण्यासाठी ज्यांच्यावर कोणतीही प्रक्रिया करण्यात आली आहे) किंवा ज्यापासून एखादे मादक द्रव्य तयार करण्यात आले आहे असे कोणतेही साहित्य याबाबत ह्या अधिनियमाखालील अपराध केला आहे असे अधिक पुराव्यावाचून गृहित धरण्यात येईल. '*

१०. अपराधिक न्यायशास्त्राप्रमाणे आरोपीवरील अपराध शंकेच्या पलीकडे जावून शाबीत करण्याची सर्वस्वी जबाबदारी अभियोग पक्षावर आहे. अभियोग पक्षातर्फे सादर

करण्यात आलेल्या पुराव्यामध्ये एखादी शंका अथवा संशय निर्माण झाल्यास सदर संशयाचा फायदा आरोपीस मिळतो.

**११.** भारतीय साक्षीपुरावा अधिनियम, १८७२ चे कलम १३४ नुसार आरोपीवरील दोषारोप सिद्ध करण्याकरीता अभियोग पक्षाला साक्षीदारांच्या विशिष्ट संख्येची आवश्यकता नाही. अभियोग पक्ष केवळ एका साक्षीदाराच्या पुराव्याच्या आधारे सुद्धा आरोपीवरील दोषारोप शाबीत करु शकतो. अभियोगपक्षाने त्यानुसार दोषारोप शाबीत करण्याकरीता सादर केलेला साक्षीदाराचा पुरावा सक्षम व विश्वासार्थ असायला हवा जेणे करुन त्यावर विसंबून राहून दोषारोप सिद्ध होतो, याव्यतिरीक्त अन्य निष्कर्ष काढता येऊ शकणार नाही.

**१२.** अभियोगपक्षाने आरोपीवरील दोषारोप शाबीत करण्यासाठी पंच प्रकाश पांडूरंग चव्हाण (अ.सा.१) यांना तपासले. त्यांनी असे कथन केले की, दि.२०/०४/२०२४ रोजी राज्य उत्पादन शुल्कचे कर्मचा–यांसोबत कुर गावच्या हद्दीत पंचनाम्याकरीता गेले होते. त्या ठिकाणी आरोपीच्या ताब्यामध्ये अवैधरितया देशी दारु संत्राच्या १८० मि.ली.च्या २६ सिलबंद बाटल्या, काचेचे ग्लास व एक पिशवी असा एकूण १,८८०/– रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. जप्त मुद्देमालातील तपासणीसाठी नमुना घेण्यात आले. त्याचा पंचनामा करण्यात आला. त्यांना सदरील पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर त्यांची सही आहे. त्यातील मजकूर खरा असून त्यास **नि.क्र.९** देण्यात आला आहे. आरोपीस पाहिले असता ओळखू शकतात. उलटतपासात त्यांनी असे कथन केले आहे की, पंचनाम्यासाठी त्यांना नोटीस आली नव्हती. ब–याच कामांमध्ये त्यांनी पंच म्हणून काम केले आहे. जप्त केलेला मुद्देमाल हा कोणत्या कंपनीचा होता हे त्यांना सांगता येणार नाही. तसेच, घटनास्थळाचा मिळकत नंबर किंवा चतुःर्सिमा सांगता येत नाहीत. त्यामुळे सदर पंचनाम्याबाबत साशंकता निर्माण होते. सदर साक्षीदाराची साक्ष ही विश्वासार्ह वाटत नाही.

**१३.** फौजदारी खटल्यामध्ये आरोपीवरील आरोप पुराव्याव्दारे संशायपलीकडे सिद्ध करणे क्रमप्राप्त असते. फौजदारी खटल्यामध्ये पंचनाम्याची महत्त्वाची भुमिका असते.

पंचनाम्यामधील वस्तुस्थिती आणि घटनास्थळी असणारी वस्तुस्थिती याची रूपरेषा तिऱ्हाईत इसमांव्दारे पोलिसांसमक्ष घेतली जाते. फौजदारी खटल्याची, तपासी यंत्रणेची विश्वासार्हता, सत्यता आणि घटना घडली त्यावेळी घटनास्थळाची व जप्तीची प्रत्यक्ष स्थिती काय होती हे दाखवण्याकरिता पंचनामा हा महत्वाची भुमिका पार पाडतो. अभिलेखावरील पुराव्याचे अवलोकन केले असता अभियोगपक्षातर्फे आरोपीविरुद्धचा दोषारोप शाबीत करणेकामी केवळ एका पंच साक्षीदाराची साक्ष नोंदविलेली आहे. तसेच अभियोगपक्षाने तपासी अधिकारी यांची साक्ष याकामी नोंदविलेली नाही. त्यामुळे, आरोपीच्या ताब्यातून जप्त केलेला पदार्थ हा मादक पदार्थ होता यावर संशय निर्माण होतो.

**१४.** अभियोगपक्षाने जप्त मुद्देमालाबाबत नमुने न्यायवैज्ञानिक प्रयोगशाळेकडे तपासणी करीता पाठविल्याचे पत्र दाखल केले आहे, परंतु संधी देऊनही न्यायवैज्ञानिक प्रयोगशाळेकडील विश्लेषण अहवाल पुराव्याकामी सादर केला नाही. तसेच, अभियोगपक्षाने नमुना बाटल्या काढल्यापासुन ते प्रयोगशाळेमध्ये पाठविण्यापर्यंत सदर बाटली कोणत्या परिस्थितीत व कोठे ठेवण्यात आली होती त्याबाबत कोणत्याही प्रकारचा खुलासा केलेला नाही. नमुना बाटली काढल्यापासुन ते प्रयोगशाळेमध्ये पाठविण्याकरीता झालेल्या विलंबाबाबत कोणतेही संयुक्तीक स्पष्टीकरण अभिलेखावर सादर केलेले नाही. सदर कालावधीमध्ये नमुना बाटलीसोबत छेडछाड होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सबब, वरील सर्व कारणास्तव अभियोगपक्षाचे खटल्याबाबत साशंकता निर्माण होत आहे. तसेच सदरकामी अभियोगपक्षाने वर्दीदार, तपासी अधिकारी यांची देखील साक्ष नोंदविलेली नाही. सबब, वरील सर्व कारणास्तव अभियोगपक्षाचे खटल्याबाबत साशंकता निर्माण होत आहे. सदर खटल्यात आरोपीविरुध्द दोषारोप सिध्द होण्यासाठी तपास यंत्रणेने मिळालेल्या बातमीनुसार नियमावली अन्वये प्रत्येक अनिवार्य प्रक्रिया पाळून, त्यानुसार राज्य उत्पादन कार्यालयातील नोंदवह्यांमध्ये आवश्यक नोंदी करुन, घटनास्थळी जावुन, पंचासमक्ष पंचांसह छापा टाकून प्रतिबंधित माल जप्त करेपर्यंतची संपूर्ण शृंखला न्यायालयापुढे शाबीत करावयाची असते. राज्य

उत्पादन शुल्क यांनी सदर केसमध्ये छापा टाकण्यासाठी वापरलेल्या खाजगी वाहनाचा तपशिल, त्याची रोजनिशी मधील नोंदीबाबत, छापा टाकतेवेळेस असलेल्या कर्मचा–यांचे टिपण, जप्त मुद्देमाल इत्यादी बाबी न्यायालयापुढे आणणे आवश्यक होते, की, जेणेकरुन अभियोगपक्षातर्फे तपासलेल्या साक्षीदारांच्या कथनास दुजोरा मिळाला असता. अभियोगपक्षाने त्यानुसार पुरावा सादर केलेला नाही. त्यामुळे मी, **विचारार्थ बाब क्र. १** करीता **नकारार्थी** निष्कर्ष नोंदवित आहे. या गुन्ह्यातील जप्त तथाकथित मादक द्रव्य यापूर्वी या न्यायालयाच्या आदेशाने नष्ट केले नसल्यास, अपील कालावधी संपुष्टात आल्यानंतर तो मुद्देमाल नष्ट करण्यात येणे आवश्यक आहे. उपरोक्त विचारार्थ बाब क्र.१ यास नकारार्थी निष्कर्ष नोंदविला असल्याने आरोपीस निर्दोष मुक्त करणे न्यायोचित राहिल म्हणुन मी, विचारार्थ बाब क्र.२ तथा न्यायनिर्णय करीता खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

| | **आदेश** |
|---|---|
| १. | आरोपी अनिता बाळासो डवरी यांची महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमाचे कलम ६५ (ई) अन्वये दंडनिय अपराधातून फौजदारी प्रक्रीया संहितेच्या कलम २५५ (१) च्या तरतुदीनुसार निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे. |
| २. | प्रकरणातील जप्त मुद्देमाल दारु तपासी अंमलदार यांनी यापूर्वी नाश केली नसल्यास अपील कालावधीनंतर ती नष्ट करण्यात यावी. |
| ३. | आरोपीचे स्वबंधपत्र व जामीनपत्र रद्द करण्यात येत आहे. |
| ४. | कॅश श्युरिटी जमा असल्यास ती अपील कालावधीनंतर आरोपीस परत करण्यात यावी. |
| ५. | फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४३७–अ च्या तरतुदीनुसार वरीष्ठ न्यायालयातील अपिलमध्ये किंवा न्यायनिर्णय विरूध्द याचिकेमध्ये |

| | |
|---|---|
| | नोटीस मिळाल्यावर हजर राहण्याकरीता आरोपीने रू.५,०००/– चे स्वबंधपत्र दाखल करावे. |
| | **(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)** |

NISHANT DIPAK RUDRABHATE
Digitally signed by NISHANT DIPAK RUDRABHATE
Date: 2026.07.23 14:52:28 +0530

स्थळ – गारगोटी		**(एन. डी. रुद्रभटे)**

दि. २३/०७/२०२६		प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, गारगोटी